महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे
Joint Commissioner, Institute of Veterinary & Biological Products, Pune
ब्रेमेन चोक, गणेशखिंड रोड, औंध, पुणे- ४११ ००७.
Bremen Chowk, Ganeshkhind Road, Aundh, Pune- 411 007.
E-mail: ivbp.pune@gmail.com
Telephone No.: 020-25697962

जा.क्र. पवैजैपनिसं/जीएनएल/एएमसी-२०२६-२७/ 389 /२०२६, पुणे ७ दिनांक : 07 FEB 2026

प्रति,

**विषय-** सन २०२६-२७ (०१/०३/२०२६ ते २८/०२/२०२७) या आर्थिक वर्षासाठी संगणक, प्रिंटर व नेटवर्कींग देखभाल करारासाठी वार्षिक करार दरपत्रके सादर करणेबाबत..

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, पशुवैद्यकिय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ या शासकीय कार्यालयातील खालील विवरणपत्रामधील तपशीलानुसार संगणक, प्रिंटर व नेटवर्किंग देखभालीसाठी वार्षिक करार करणेसाठी सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | संगणक देखभाल | २५ | - |
| ०२ | लॅपटॉप देखभाल | १ | - |
| ०३ | प्रिंटर देखभाल | ३१ | - |
| ०४ | संगणक, प्रिंटर यांचे लॅन नेटवर्किंगची देखभाल | १ | - |
| ०५ | कार्टेज रिफिंलिग एचपी १२A | - | - |
| ०६ | कार्टेज रिफिंलिग एचपी ३५A | - | - |
| ०७ | कार्टेज रिफिंलिग एचपी ८८A | - | - |
| ०८ | कॅनॉन काट्रेज ३३७ स्टार्टर | - | - |
| ०९ | कॅनॉन काट्रेज ९२५ | - | - |
| | (सर्व करासहित) एकूण | | |

सदर दरपत्रके या कार्यालयास मोहरबंद पाकिटात सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकिय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध,पुणे-७ या नावाने दिनांक- १३/०२/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मुदतीनंतर दरपत्रके प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सोबत:** अटी व शर्ती

(डॉ. याह्ययाखान अ. पठाण) 7/02
सहआयुक्त पशुसंवर्धन,
पशुवैद्यकिय जैव पदार्थ निर्मिती संस्था,
औंध,पुणे-०७

<u>संगणक, प्रिंटर व नेटवर्कींग वार्षिक देखभाल करार करणेसाठी अटी व शर्ती</u>

१. **दरपत्रक मोहोरबंद पाकिटारवर सहआयुक्त पशुसंवर्धन**, पशुवैद्यकिय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७ या कार्यालयातील " **संगणक, प्रिंटर व नेटवर्कींग वार्षिक देखभाल करार** " असे लिहणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक वस्तुचे दर वेगवेगळे नमूद करण्यात यावेत. दरपत्रिकेतील दर सर्व करासहित असणे आवश्यक आहे. दरपत्रिकेत नमूद करण्यात आलेले दर हे स्विकृतीनंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही.

३. वार्षिक देखभाल करारामध्ये दरमहा संगणक, प्रिंटर व लॅन नेटवर्किंग यंत्रणेची तपासणी करून द्यावी लागेल. तपासणीच्या प्रत्येक वेळी काम पूर्ण झाल्यानंतर कॉल रिपोर्ट द्यावा लागेल.

४. संगणक, प्रिंटर व लॅन नेटवर्किंग बाबत काही सुटे व किरकोळ भाग खराब/निकामी झाल्यास त्याची बदली करून द्यावी लागेल.

५. वार्षिक देखभाल करारामध्ये हार्डवेअर व सॉफ्रटवेअर तसेच नेटवर्कींग च्या तक्रारीची पूर्तता करावी लागेल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवल्यास दूरध्वनी केलयानंतर दोन तासाचे आत दरपत्रकदाराने स्वत: किंवा प्रतिनिधी समस्या निराकरणासाठी तात्काळ कार्यालयात पाठविणे बंधनकारक राहील.

६. कंपनीमार्फत येणाऱ्या प्रतिनिधींचे भ्रमणध्वनी क्रमांक, आपले कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक यांच्या बदलाबाबतची माहिती कार्यालयास वेळोवेळी कळविणे आवश्यक राहील.

७. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

८. यशस्वी दरपत्रक धारकास अटी व शर्ती मान्य असल्यास स्वतंत्रपणे रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

९. दरपत्रकदाराकडून पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक नसल्यास व तसे या कार्यालयाने लेखी कळविल्यास पंधरा दिवसाचे आत वार्षिक करारांतर्गत अदा केलेली रक्कम एक रकमी कार्यालयात जमा करावी लागेल.

११. दरकरार संपुष्टात आणणे, किंवा मुदतवाढ देणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे याबाबत सर्व अधिकार सहआयुक्त **पशुसंवर्धन**, पशुवैद्यकिय जैवपदार्थ निर्मिती संस्था, औंध, ३पुणे-७ यांना राहतील.

(डॉ. योहयाखान अ. पठाण)
सहआयुक्त पशुसंवर्धन,
पशुवैद्यकिय जैव पदार्थ निर्मिती संस्था,
औंध,पुणे-०७